दै. सामना

# मतदार यादीतील त्रुटींबाबत ६२ आक्षेप

नांदेड, दि. ३१ (प्रतिनिधी)- नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीची हालचाल सुरू झाली असली, तरी मतदार यादीतील गोंधळाबाबत मात्र संभ्रम कायम आहे. मतदार यादीतील त्रुटींबाबत शहरातून एकूण ६२ आक्षेप दाखल झाले असून, त्यांचा निकाल ७ सप्टेंबर रोजी निवडणूक आयोग लावणार आहे.

महानगरपालिकेच्या निवडणुकीची अधिसूचना ६ किंवा ७ सप्टेंबरला जारी होईल, अशी चर्चा आहे. त्यापूर्वी मतदान यादीची सुधारणा करण्याची मागणी करण्यात आली आहे. मतदान यादीवर आक्षेप नोंदविण्याची अंतिम तारीख २९ ऑगस्ट होती. त्या तारखेपर्यंत नांदेडच्या महानगरपालिकेच्या निवडणूक अधिकाऱ्यांकडे एकूण ६२ तक्रारी दाखल झाल्या आहेत.

## ७ सप्टेंबर रोजी निकाल

वजिराबाद विभागात म्हणजे झोन क मध्ये सर्वात जास्त ४७ तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्याखालोखाल अशोकनगर भागात म्हणजे झोन २ मध्ये १० तक्रारी, झोन अ मध्ये ३ आणि झोन ड मध्ये २ अशा एकूण ६२ तक्रारी दाखल झाल्या आहेत.

या तक्रारींमध्ये मुख्यत्वे करून स्थलांतराच्या तक्रारी आहेत. आपले नाव वेगळ्याच प्रभागाच्या मतदार यादीत आहे आणि आपण स्थलांतर दुसरीकडेच केलेले आहे म्हणून आपले नाव स्थलांतरित केलेल्या भागात नोंदविण्यात यावे, अशी मागणी करणारे बहुसंख्य अर्ज आहेत. काहींनी आपले नाव मतदार यादीत नसल्याची तक्रारही केली आहे.

नांदेड - वाघाळा महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेता प्रमोद खेडकर यांनी आयुक्तांना २३ ऑगस्ट रोजी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, माझ्या प्रभागातील अनेक मतदारांनी स्थलांतर केले आहे आणि या स्थलांतराची सूचना, आक्षेप नोंदविण्याच्या शेवटच्या तारखेच्या आत केली आहे. तरी मतदार यादीत योग्य तो बदल करून मतदारांची 'नावे स्थलांतरित भागात समाविष्ट करण्यात यावीत, अशी विनंती खेडकर यांनी केली आहे.

प्रभाग क्र. ६ चे शिवसेना विभागप्रमुख उमेश डिगे यांनीही आयुक्तांना पत्र लिहून प्रभाग क्र. ६ मधील दीपनगर, बजाजनगर या भागातील नागरिकांनी इतरत्र स्थलांतर केले आहे व त्याची सूचना विहित तारखेपूर्वीच दिली आहे. या मतदारांची नावे सुधारित यादीत समाविष्ट करावीत, अशी विनंतीही डिगे यांनी केली आहे.

दै. लोकमत

# मतदारयादीवर ६७ आक्षेप

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड:** महापालिका निवडणुकीसाठी १९ ऑगस्ट रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीवर आतापर्यंत ६७ आक्षेप आले आहेत. या सर्व आक्षेपांच्या निकालानंतर ७ सप्टेंबर रोजी मतदार यादी अंतिम केली जाणार आहे.

महापालिकेच्या २० प्रभागासाठी महापालिकेने १९ ऑगस्ट रोजी प्रसिध्द केलेल्या प्रारूप मतदार यादीत ३ लाख ९६ हजार ३९६ मतदार आहेत. यामध्ये २० प्रभागात सर्वाधिक मतदार हे सिडको प्रभागात राहणार आहेत. येथे तब्बल २१ हजार ३१५ मतदार आहेत. तर सर्वात कमी मतदार हे प्रभाग क्र ११ हैदरबाग प्रभागात आहेत. येथे केवळ १५ हजार ६३१ मतदार आहेत. नांदेड उत्तर आणि नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातून महापालिका हद्दीत प्रभागनिहाय याद्या करण्यात आल्या आहेत. शहरातील ४ क्षेत्रिय कार्यालयांमध्ये हे काम पूर्ण झाल्यानंतर १९ रोजी मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली होती. यादीवर २८ ऑगस्टपर्यंत आक्षेप मागवण्यात आले होते. या कालावधीत एकूण ६७ आक्षेप प्राप्त झाल्याची माहिती महापालिका निवडणूक विभागाच्या वतीने देण्यात आली.